(9) Dr. Sanjay Talatkar (Eco) 127



IRJHIS

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES

( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )

DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# भारतातील दारिद्र्य व गरिबीचा निर्देशांक
# (Index of poverty and poverty in India)

प्रा. डॉ. संजय तळतकर

अर्थशास्त्र विभाग,

महिला कला महाविद्यालय,

गेवराई, जि. बीड

E-mail: sanjaytalatkar@rediffmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/08.2022-56117271/IRJHIS2208002**

**प्रस्तावना** :

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या किमान गरजा मानल्या जातात. आजच्या आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये शिक्षण व आरोग्य यासुद्धा मानवाच्या किमान गरजा मानल्या जातात. गरिबी म्हणजे समाजव्यवस्थेमधील असा एक गट की, जो आपल्या दैनंदिन उत्पन्नातून आपल्या आणि आपल्या कुटुंबांच्या किमान आवश्यक गरजा पूर्ण करू शकत नाही आणि असा गट सामाजिक सेवांचा लाभ घेण्यापासून वंचित असतो. भारतातील बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य हे प्राचीन गरिबी म्हणजे मानवापुढील अशी परिस्थिती की, ज्यात एखादी व्यक्ती जीवन जगण्यासाठी आवश्यक वस्तू विकत घेण्याइतपत उत्पन्न कमवायला असमर्थ ठरते. प्राचीन काळापासून गरिबी ही भारतीय अर्थव्यवस्थे पुढील सर्वात मोठी समस्या आहे. भारत सरकारने स्वातंत्र्यापासून दारिद्र्य निर्मूलनावर सर्वात जास्त भर दिला, परंतु आजही आपणाला पाहिजे त्या प्रमाणात यश मिळाले नाही. भारतात शहरी दारिद्र्यापेक्षा ग्रामीण व आदिवासी भागात ही। समस्या मोठ्या प्रमाणात आहे. याला सर्वात मोठे कारण म्हणजे अपूर्ण रोजगार आहेत. गरिबीची समस्या विकसनशील आणि अविकसित राष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात आढळते.

**1) दारिद्र्य मापनाची संकल्पना** :

**दारिद्र्य म्हणजे काय** : अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. मानवाला अन्न वस्त्र आणि निवारा या किमान गरजा भागविण्या करीता पैशाची गरज असते. जी व्यक्ती या किमान गरजा भागविण्याकरिता पुरेसे उत्पन्न मिळवू शकत नाही किंवा या किमान गरजा भागविण्यास असमर्थ असते अशा व्यक्ती द्ररिद्री आहे असे मानले जाते.

दारिद्र्याची व्याख्या दोन प्रकारे केली जाते-

1) **सापेक्ष दारिद्र्य** : सापेक्ष दारिद्र्य म्हणजे एका व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या उत्पन्नाची दुसऱ्या व्यक्तीच्या किंवा राष्ट्रांच्या उत्पन्नासोबत तुलना करून जी सरासरी काढली जाते त्याला सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. उदा. अमेरिकेच्या तुलनेत आपले दरडोई उत्पन्न कमी आहे. त्यामुळे अमेरिकेच्या तुलनेत आपण दारिद्र्य आहोत. हेच जर बांगला देशासोबत तुलना केल्यास बांगला देश दारिद्री ठरतो. यालाच सापेक्ष दारिद्र्य म्हणतात.

2) **निरपेक्ष दारिद्र्य** : निरपेक्ष दारिद्र्यालाच स्थूल दारिद्र्य असेसुद्धा म्हणतात. निरपेक्ष दारिद्र्य म्हणजे जी व्यक्ती किंवा कुटुंब आपल्या किमान किंवा मूलभूत गरजा भागविण्याकरिता आवश्यक उत्पन्न मिळवू शकत नसेल किंवा आपल्या उत्पन्नातून दैनंदिन गरजा भागवू शकत

नसेल तर अशी व्यक्ती किंवा कुटुंब दारिद्री आहे असे मानले जाते.

**दारिद्र्य रेषा म्हणजे काय** : दारिद्र्य रेषा ही अशी काल्पनिक रेषा आहे की, त्यारेषेच्या खाली असणारी जनता आपल्या किमान गरजा भागविण्याच्या इतपत उत्पन्न मिळवू शकत नाही. अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन महत्त्वाच्या गरजांपैकी एक गरज म्हणजे अन्न होय. मानवाने ग्रहण केलेल्या या अन्नामधूनच त्यास रोजचे श्रम करण्यास आवश्यक असणारे उष्मांक किंवा ऊर्जा उपलब्ध होत असते. मानावाच्य ज्या प्रमाणात शारीरीक कामे व हालचाली असतील त्या प्रमाणात त्याच्या शरीराला उष्मांक पुरविणाऱ्या अन्नाची गरज असते.

भारतीय वैद्यकीय संशोधन संस्थेच्या मते खेडेगावात शेतीत श्रम करणाऱ्या सक्षम व्यक्तीला दररोज किमान 2400 उष्मांकांची, तर शहरी भागात बैठे काम करणाऱ्या व्यक्तीला 2100 उष्मांकाची आवश्यकता असते. प्रत्येक व्यक्तीस त्यास पुरेसे उष्मांक देणारे अन्न विकत घेण्याकरिता जो किमान खर्च लागतो ती मौद्रिक राशी म्हणजे दारिद्र्य रेषा होय व जे कुटुंब हा खर्च करण्याइतके सक्षम नाही, ते कुटुंब म्हणजे दारिद्र्य रेषेखालील कुटुंब म्हणून ओळखले जाते.

दारिद्र्य रेषेची ही संकल्पना राष्ट्रपरत्वे बदलू शकते. सामान्यतः कमी विकसित राष्ट्रे अत्यावश्यक गरजांवर आणि विकसित राष्ट्रे जीवनमानाच्या संकल्पनेवर आपली दारिद्र्य रेषा निश्चीत करीत असते. भारत सरकारने उष्मांकाच्या आधारावर दारिद्र्य रेषा निश्चीत केली आहे.

2) **दारिद्र्यरेषेचे अंदाज व समित्या** :

भारतातील दारिद्र्याचा अंदाज भारतातील विविध अर्थशास्त्रज्ञानी, संस्थांनी भारतातील ग्रामीण दारिद्र्याचा अभ्यास करून आपल्यापरीने अंदाज व्यक्त केलेले आहेत. त्यापैकी गाजलेल्या काही महत्त्वाच्या समित्या

1) **श्री. पी.डी. ओझा यांचा दारिद्र्याचा अंदाज** (1962) : दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या मोजताना श्री. ओझा यांनी सरासरी उष्मांकाचा आधार घेतला. दर दिवशी दरडोई 2250 कॅलरी उअमांक आहार न मिळणारे कुटूंब दारिद्र्य रेषेखालील आहे असे त्यांनी मत मांडले. सन 1960-61 च्या किमतीनुसार ग्रामीण भागात 8.11 रुपये तर, शहरी भागात 15 ते 18 रूपये महिन्याला उपभोगावर खर्च झाले पाहिजेत असा अंदाज त्यांनी मांडला.

2) **दांडेकर व रथ यांचे भारतीय दारिद्र्याचे अंदाज** : डॉ. व्ही. एम. दांडेकर व श्री. नीळकंठ रथ यांच्या मते, प्रत्येक मनुष्याला दसरोज किमान 2,250 उष्मांक देणारा आहार मिळाला पाहिजे. 2250 उष्मांक देणारे अन्न त्यांना घेता यावे यासाठी त्यांनी सन 1960-61 च्या किमतीनुसार ग्रामीण लोकांना दरडोई वार्षिक 180 रुपये तर शहरी भागाकरीता 270 रुपये मिळाले पाहिजेत असा अदांज त्यांनी मांडला होता. सन 1968-69 किमतीनुसार दरडोई वार्षिक उत्पन्नाची राशी ग्रामीण भागाकरिता 324 रुपये आणि शहरी भागाकरिता 480 रुपये ठरविण्यात आली होती.

3) **अहलुवालिया समिती ग्रामीण दारिद्र्याचा अभ्यास (सन** 1977) : प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मोटेकसिंग अहलुवालिया यांच्या मते, सन 1960-61 च्या किमतीनुसार किमान दरडोई मासिक खर्चाची पातळी ग्रामीण क्षेत्रासाठी 15 रुपये असावी तर शहरी भागाकरिता 20 रुपये असावी, यांच्या अभ्यासाचे वैशिष्ट्य असे की बाजारातील चढउतारांचा ग्रामीण दारिद्र्यावर महत्त्वाचा परिणाम होतो असे त्यांनी मत मांडले. त्यांच्या मते शेती उत्पादनातील घट किंवा बाढ ग्रामीण दारिद्र्यावर महत्त्वाचा परिणाम करते. शेती उत्पादन चांगले झाले की ग्रामीण दारिद्र्यात घट होते. शेती उत्पादनात घट झाल्यास ग्रामीण दारिद्र्यात बाद करते,

4) **अलघ कार्यगट (सन** 1979) : सन 1979 मध्ये भारत सरकारने अर्थतज्ञ वाय. के. अलघ यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यगट नियुक्त केला. या गटाने दारिद्र्य देषेखालील कुटूंबाची गणना कॅलरीच्या आधारावर केली. या गटाने ग्रामीण भागात 2400 कॅलरी व शहरी भागात 2100 कॅलरी दरडोई अन्न न घेवू शकणारे कुटूंब दारिद्र्य रेषेखालील मानले जावे अशी शिफारस केली. भारत सरकारने ही शिफारस स्विकरून त्यावर विकास कार्यक्रमाची घोषणा केली होती.

5) **जागतिक बँकेचा दारिद्र्याचा अंदाज** : नियोजन मंडळाने स्वीकारलेल्या पद्धतीने जागतिक बँकेने सन 1989 मध्ये भारतीय दारिद्र्याचा अंदाज केला, नियोजन मंडळाने सन 1973-74 मध्ये ग्रामीण क्षेत्रात दरडोई दरमहा 48.1 रुपये दारिद्र्यरेषा निश्चित केली.

जागतिक बँकेने राष्ट्रीय नमुना पाहणीने प्रगत केलेली किंमत बदल मालिका अबलंबिली भारतात चालू किमतीनुसार दरडोई दरमहा ग्रामीण क्षेत्रात 55.2 रुपये सन 1977-78 मध्ये आणि 1983 मध्ये 89 रुपये दारिद्र्य रेषेची मर्यादा निश्चित केली.

6) **नियोजन मंडळाच्या तज्ज्ञ समितीचा अहवाल (सन 1993)** : प्रा.डी.टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने सन 1993 मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यानुसार सन 1973-74 च्या किमतीनुसार दारिद्र्यरेषा म्हणून ग्रामीण भागात दरडोई मासिक खर्च रूपये 49.09 आणि शहरी भागात 56.64 रुपये निश्चित करण्यात आला. त्यासाठी 2400 उष्मांक देणारा आहार दरडोई दर दिवशी निर्धारित करण्याची शिफारस करण्यात आली.

7) **प्रा. सुरेश तेंडुलकर समिती (सन 2008)** : भारत सरकारने सन 2008 मध्ये दारिद्रयरेषेचा अभ्यास करण्याकरिता प्रा. सुरेश तेंडुलकर समिती नेमली. या समितीने उपभोग खर्चाच्या आधारे दारिद्र्य रेषा निश्चित करण्याचा नवीन पर्याय सुचविला. प्रत्येक कुटुंबास आपला किमान उपभोग पूर्ण करण्यास ज्या वस्तूची गरज असते त्याच्या किंमती लक्षात घेऊन त्याला लागणाऱ्या खर्चाच्या आधारे दारिद्र्य रेषा निश्चीत करावी असा पर्याय सुचविला. यालाच त्यांनी राहणीमानाचा खर्च (Cast of living) असे नांव दिले. प्रा. सुरेश तेंडुलकर समितीच्या शिफारशीनुसार सन 2004-05 या वर्षात भारतातील 37.2% जनता दारिद्रयरेषेखाली असल्याचे प्रसिध्द केले; की जी, पूर्वीच्या दांडेकर आणि रथ समितीच्या सूत्रानुसार 27.5% येत होती.

8) **नियोजन आयोगाने प्रसिद्ध केलेली आकडे वारी** (2010) : नियोजन आयोगाचे सदस्य अभिजित सेन यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालातील आकडेवारीनुसार सन 2004-10 या कालावधीमध्ये भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांच्या प्रमाणात घट झाल्याचे म्हटले आहे. सन 2001-05 या वर्षांत भारतातील 37.5% जनता दारिद्रव रेषेखाली होती. हे प्रमाण सन 2009-10 या वर्षात 32% आले आहे

9) **डॉ. सी. रंगराजन समिती** (2014) : सन 2011 मध्ये योजना 10 आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दारिद्रयरेषेच्या संबंधात दाखल केलेल्य शपथपत्रामध्ये असे म्हटले होते की, जी व्यक्ती आपल्या किमान गरंजा भागविण्याकरिता दरदिवशी ग्रामीण भागात 26 रुपयांपेक्ष अधिक आणि शहरी भागाकरिता 32 रुपयांपेक्षा अधिक खर्च अशी व्यक्ती दारिद्रयरेषेखाली नाही. योजना आयोगाची ही आकडेवाल तेंडुलकर समितीच्या अहवालावर आधारित होती. योजना आयोगाच्या या शपथपत्रावर संपूर्ण देशात टीका होऊ लागली होती. या घटनेमुळे दारिद्र रेषेखालील मुद्याचा अभ्यास करण्याकरिता डॉ. सी. रंगराजन समिती नेमली. या समितीने आपल्या अहवालात 2011-12 किमतीनुसार ग्रामीण भागाकरिता दरडोई 32.4 रुपये आणि शह भागाकरिता दरडोई 46.9 रुपये खर्चाची मर्यादा दिली.

| **अर्थ तज्ज्ञ** | **वर्ष** | दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती **(दशलक्ष)** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **ग्रामीण** | **शहरी** | **एकूण** | **दारिद्र्य रेषेचे मानक** |
| 1. पी.डी. ओझा | 1960-61 | 184 | 6 | 190 | 1) ग्रामीण भागात दरडोई उपभोग 8 ते 1रुपये<br>2) शहरी भाग 15-18 रुपये<br>(1960-61 च्या स्थिर किमतीनुसार) |
| 2. पी.के. वर्धन | 1960-61 | 131 | -- | 131 | 1960-61 च्या कृषी किमतीच्या निर्देशांकानुसार मासिक 15 रुपये. |
| 3. बी.एस. मिन्हास | 1956-57 | 181 | -- | 181 | 1960-61 च्या स्थिर किमतीनुसार 20 रुपये. |
| 4. एम. अहलुवालिया | 1956-57<br>1967-68<br>1973-74 | 191<br>235<br>241 | --<br>--<br>-- | 191<br>--<br>-- | 1960-61 च्या स्थिर किमतीनुसार<br>1) मासिक 15 रूपये ग्रामीण भागाकरिता व<br>2) मासिक 20 रूपये शहरी भागाकरिता |
| 5. दांडेकर व रथ | 1960-61 | 135 | 42 | 177 | 1960-61 च्या स्थिर किमतीनुसार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 1969-70 | 166 | 49 | 215 | 1) मासिक 15 रूपये ग्रामीण भागाकरिता व<br>2) 22.5 रूपये शहरी भागाकरिता |
| 6. सहावी पंचवार्षिक योजना | 1970-71 | 260 | 57 | 317 | 1979-80 च्या चालू किमतीनुसार ग्रामीण भागाकरिता मासिक 76 रुपये आणि शहरी भागाकरिता मासिक 88 रुपये |
| 7. वि.म. दांडेकर | 1971-72<br>1977-78<br>1983-84 | 238<br>284<br>286 | --<br><br>-- | 238<br><br>286 | 1971-72 च्या चालू किमतीनुसार ग्रामीण भागाकरिता मासिक 32.7 रुपये 1977-78 च्या चालू किमतीनुसार ग्रामीण भागाकरिता मासिक 54.4 रुपये 1983-84 च्या चालू किमतीनुसार ग्रामीण भागाकरिता मासिक 88.4 रुपये. |
| 8. जागतिक बँक | 1983 | 252 | 65 | 317 | 1983-84 च्या चालू किमतीनुसार<br>1) ग्रामीण भागाकरिता मासिक 89.0 रुपये व<br>2) शहरी भागाकरिता मासिक 111.2 रुपये |
| 9. मिन्हास, जैन व तेंडुलकर | 1987-88 | 284 | 77 | 361 | 1987-88 च्या चालू किमतीनुसार<br>1) ग्रामीण भागाकरिता मासिक 122.6 रुपये व<br>2) शहरी भागाकरिता मासिक 158.3 रुपये. |
| 10. योजना आयोग | 1987-88 | 229 | 83 | 312 | 1987-88 च्या चालू किमतीनुसार<br>1) ग्रामीण भागाकरिता मासिक 115.53 रुपये<br>2) शहरी भागाकरिता मासिक 165.58 रूपये |
| 11. उकडावाला समिती | 1993-94 | 211 | 66 | 277 | 1973-74 च्या किमतीनुसार<br>1) ग्रामीण भागाकरिता दरडोई 49.09 रुपये आणि<br>2) शहरी भागाकरिता दरडोई 56.50 रुपये |
| 12. तेंडुलकर समिती | 2008 | 216.7 | 53.1 | 269.8 | 2011-12 च्या किमतीनुसार<br>1) ग्रामीण भागाकरिता दरडोई 27.2 रुपये आणि<br>2) शहरी भागाकरिता दरडोई 33.3 रुपये. |
| 13. डॉ. सी. रंगराजन समिती | 2014 | 260.5 | 102.5 | 363 | 2011-12 च्या किमतीनुसार<br>1) ग्रामीण भागाकरिता दरडोई 32.4 रुपये आणि<br>2) शहरी भागाकरिता दरडोई 46.9 रुपये. |

(3) **डॉ. सी. रंजराजन समितीचा अहवाल** :

रंगराजन समितीने खालील घटकात्रच्या आधारे दारिद्र्यरेषा निश्चीत करण्याचा पर्यार भारत सरकारला सुचविला.

1) दारिद्र्यरेषा निश्चित करण्याकरिता पोषण घटक, कापड, घराचे भाडे, दळणवळणाच्या साधनावरील खर्च, आणि अन्नावरील खर्च वगळता इतर खर्चाचा समावेश करण्यात यावा.

2) पोषण घटकाचा अभ्यास करताना या समितीने भारतीय अनुसंधान केंद्रांशी सल्लामसलत वय आणि लिंग या आधारे कॅलरी,

131

प्रथिने आणि स्निग्ध पदार्थाचे सेवन या आधारे खालील मानके निश्चित केली आहेत

| मानक | ग्रामीण क्षेत्र | शहरी क्षेत्र |
|---|---|---|
| 1. कॅलरीचे सेवन प्रतिव्यक्ती प्रतिदिन किमान सेवन | 2155 | 2090 |
| 2. प्रथिने सेवन प्रतिव्यक्ती प्रतिदिन किमान सेवन | 48 ग्रॅम | 50 ग्रॅम |
| 3. स्निग्ध पदार्थ सेवन प्रतिव्यक्ती प्रतिदिन किमान सेवन | 28 ग्रॅम | 26 ग्रॅम |

**दारिद्र्यरेषा** : या समितीने वरील सर्व गरजा लक्षात घेऊन खालीलप्रमाणे दारिद्र्यरेषा निश्चित केली. ही रेषा सन 2011-12 च्या चालू किमतीवर आधारित आहे. खाली दिलेली खर्चाची आकडेवारी ज्प्रतिव्यक्ती सरासरी मासिक उपभोग खर्चावर आधारित आहे.

| निर्धनता रेषेचे घटक | ग्रामीण क्षेत्र | शहरी क्षेत्र |
|---|---|---|
| 1. पौष्टिक भोजनावरील खर्च प्रतिदिवसाची किमान गरज | 554 रूपये | 656 रूपये |
| 2. कपडा, घरभाडे, परिवहन व शिक्षणावरील खर्च | 141 रूपये | 407 रूपये |
| 3. अन्नावरील खर्च वगळता इतर खर्च | 277 रूपये | 344 रूपये |
| 4. एकूण प्रतिव्यक्ती सरासरी मासिक खर्च | 972 रूपये | 1407 रूपये |
| 5. पाच व्यक्तींच्या परिवाराचा एकूण खर्च | 4860 रूपये | 703 रूपये |
| 6. प्रतिव्यक्ती प्रतिदिन खर्च | 32.4 रूपये | 46.9 रूपये |

| राज्याचे नांव | | दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या | |
|---|---|---|---|
| | | एकूण लोक संख्या (लाख) | प्रमाण |
| 1. | आंध्रप्रदेश | 117.3 | 13.7 |
| 2. | अरूणाचल प्रदेश | 5.3 | 37.4 |
| 3. | आसाम | 129.5 | 40.9 |
| 4. | बिहार | 438.1 | 41.3 |
| 5. | छत्तीसगड | 124.8 | 47.9 |
| 6. | गोवा | 0.9 | 6.3 |
| 7. | गुजरात | 168.8 | 27.4 |
| 8. | हरियाणा | 32.4 | 12.5 |
| 9. | हिमाचल प्रदेश | 7.5 | 10.9 |
| 10. | जम्मू व काश्मिर | 19.3 | 15.1 |
| 11. | झारखंड | 142.5 | 42.4 |
| 12. | कर्नाटक | 135.7 | 21.9 |
| 13. | केरळ | 38.3 | 11.3 |
| 14. | मध्यप्रदेश | 327.8 | 44.3 |
| 15. | महाराष्ट्र | 228.3 | 20.0 |
| 16. | मणिपूर | 12.9 | 46.7 |
| 17. | मेघालय | 7.4 | 24.4 |
| 18. | मिझोराम | 3.1 | 27.4 |
| 19. | नागालॅंड | 2.8 | 14.0 |

| | | | |
|---|---|---|---|
| 20. | ओडिशा | 195.0 | 45.9 |
| 21. | पंजाब | 31.6 | 11.3 |
| 22. | राजस्थान | 151.5 | 21.7 |
| 23. | सिक्कीम | 1.1 | 17.8 |
| 24. | तामिळनाडू | 163.9 | 22.4 |
| 25. | त्रिपुरा | 9.3 | 24.9 |
| 26. | उत्तरप्रदेश | 809.1 | 39.8 |
| 27. | उत्तराखंड | 18.4 | 17.8 |
| 28. | पश्चिम बंगाल | 275.4 | 29.7 |
| | **केंद्रशासित प्रदेश** | | |
| 1. | दिल्ली | 124.8 | 26.7 |
| 2. | पुद्दुचेरी | 1.0 | 707 |
| 3. | चंदीगड | 2.3 | 21.3 |
| 4. | दादरा नगर हवेली | 1.3 | 35.6 |
| 5. | लक्षद्वीप | 0.0 | 6.5 |
| 6. | अंदमान-निकोबार | 0.2 | 0.6 |
| | **संपूर्ण भारत** | 3629.9 | 29.5 |

**4) भारतातील दारिद्र्याची कारणे :**

भारतातील दारिद्र्याच्या आकडेवारीचा अभ्यास करता आजही भारतातील 35% पेक्षा अधिक जनता दारिद्र्यरेषेखाली आहे. भारताला स्वातंर्त्य मिळून साठ वर्षांचा कालावधी संपला आणि साठ वर्षांच्या काळात अकरा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या तरी आजपर्यंत भारतीय लोकांच्या दारिद्र्याचा प्रश्न संपुष्टात आला नाही. याला प्रामुख्याने खालील कारणे आहे.

1) लोकसंख्या वाढीचा प्रचंड वेग : सन 1921 पर्यंत भारताची लोकसंख्या स्थिर होती. त्यानंतर भारताच्या लोकसंख्येत सातत्याने बाढ होत आहे. स्वातंर्त्यानंतर भारताच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आज जगातील 2.4% भू-भाग भारताच्या वाट्याला आला असून जगाच्या एकूण लोकसंख्येच्या 17% अधिक लोकसंख्या भारतात आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटीपेक्षा अधिक असून भारताचा जगात चीननंतर दुसरा क्रमांक लागतो. सन 1951 नंतरच्या प्रत्येक दशकात लोकसंख्या वाढीचा दर जवळजवळ 25% इतका आहे. लोकसंख्या वाढीचा सर्वात पहिला प्रतिकूल परिणाम राष्ट्रांच्या दरडोई उत्पन्नावर होत असतो. स्वातंर्त्यानंतर राष्ट्राच्या आर्थिक विकासावर कोट्यवधी रूपये खर्च करण्यात आले. आपल्या राष्ट्रीय उत्पन्नातसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली. विज्ञान, तंत्रज्ञान व राहणीमान इत्यादी अनेक बार्बीमध्ये काही राष्ट्रांच्या तुलनेत आपण पुढारलेले असलो तरी दरडोई उत्पन्नाबाबत आजही आपण श्रीलंका व पाकिस्तान या राष्ट्राच्या मागे आहोत. लोकसंख्येबाबतीत इतर देशांशी तुलना केल्यास, भारताची लोकसंख्या अमेरिकेच्या लोकसंख्येच्या अडीच पट व इंग्लंडच्या दहा पट आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न मात्र भारताच्या 30 पट तर इंग्लंडचे 16 पट जास्त आहे. भारत सरकार विकास योजनेमधील बराचसा खर्च जनतेला किमान गरजा पुरविणे आणि त्यांच्या राहणीमानावर खर्च करावा लागतो. त्यामुळे उत्पादक रोजगार पुरविणाऱ्या विकासकामावर मर्यादा येते.

2) बेकारीची समस्या : वाढत्या लोकसंख्येनुसार श्रमशक्ती वाढत जाते. वाहत्या श्रमशक्तीनुसार रोजगाराचा पुरवठा नसेल तर बेकारीची समस्या निर्माण होते. सन 1983 मध्ये भारतात 21.7 दशलक्ष श्रमशक्ती बेकार होती आणि याचकाळात बेकारीचा दर 8.3% होता. सन 1999-00 च्या आकडेवारीनुसार 26.58 दशलक्ष श्रमशक्ती बेकार आहे. गेल्या काही वर्षात रोजगाराच्या संधीत वाढ होत असली तरी बेकारीमध्ये कोणताही फरक पडलेला नाही. होत असली तरी बेकारीमध्ये कोणताही फरक पडलेला नाही.

133

या प्रकारची बेकारी भारतात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आढळते. भारतीय शेती हंगामी स्वरूपाची असून ती पावसावर अवलंबून आहे शेतावर काम करणाऱ्या शेतकरी व शेतमजूरांना हंगामातील 6-8 महिनेच काम मिळते. वर्षाचा बाकी काळ त्यास बेरोजगार म्हणून काढावा लागतो. यालाच हंगामी बेकारी असे म्हणतात.

3) अनुत्पादक लोकसंख्येचे प्रमाण जास्त देशातील लोकसंख्येमध्ये अनुत्पादक लोकसंख्येचे वाढते प्रमाण हे अतिरिक्त लोकसंख्येचे महत्त्वपूर्ण लक्षण मानले जाते. भारतातील कुटुंबातील एक व्यक्ती रोजगार मिळवितो आणि इतर सर्व लोक त्यांच्या उत्पन्नावर उपजीविका करतात. घरातील लहान मुले, घर सांभाळणाऱ्या स्त्रिया आणि म्हातारी मंडळी हे अनुत्पादक गटात मोडणारी मंडळी आहे. लोकसंख्येपैकी 15-60 वयोगटात येणारी लोकसंख्या कर्ती लोकसंख्या म्हणून ओळखली जाते. सन 2001 च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 36.5% लोकसंख्या 0-14 वर्ष वयोगटापर्यंतची, 57.1% लोकसंख्या 84-80 वर्षे वयोगटापर्यंतची व 6.4% लोकसंख्या त्यापुढील वयोगटाची आहे. 57.1% लोकसंख्यापैकी 37.6% लोकसंख्या उत्पादक वर्गात मोडते व 62.4% लोकसंख्या अनुत्पादक वर्गात मोडते. यापैकी 84 - 0 वयोगटात येणाऱ्या कर्ती लोकसंख्येपैकी उत्पादक गटात येणारी कर्ती लोकसंख्या वगळता इतर अनुत्पादक लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 62.4% आहे.

4) उत्पादक मालमत्तेचा अभाव : ग्रामीण भागातील जनतेच्या उपजीविकेचा महत्त्वपूर्ण आधार म्हणजे शेती होय. आजही भारतातील 65% जनतेचा रोजगार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या शेतीशी निगडित आहे. गेल्या साठ वर्षात भारताची लोकसंख्या 36.1 (1951) कोटींवरून 121 (2011) कोटींवर पोहचली. दरडोई उत्पन्नातसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली परंतु ग्रामीण भागातील जनतेच्या उत्पन्नात फारशी वाढ झाली नाही. याला कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येनुसार ग्रामीण भागातील जनतेला उत्पादन रोजगार लागवडीखालील क्षेत्राबाबत फारशी वाढ झाली नाही. सन 1950-51 मध्ये 118.75 दशलक्ष हेक्टर जमीन लागवडीखाली होती सध्या 141.23 हेक्टर जमीन लागवडीखाली आहे. यावरून वाढत्या लोकसंख्येचा भार हा शेतीलाच सहन करावा लागत आहे असे लक्षात येते. भारतीय संस्कृतीमध्ये शेती ही वारसाहक्काचा आधार मानला जातो. त्यामुळे वडिलांच्या नावावर असलेली शेती ही वारसाहक्कांने मुलांमध्ये विभाजित केली जाते. या कारणामुळे भारतीय शेतीचे मोठ्या प्रभाणात अपखंडन होत आहे. या कारणांमुळे शेतजमीनीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची सातत्याने वाढत असून त्या प्रमाणात त्यांच्या उत्पन्नात सुध्दा सातत्याने घट होत आहे.

**दारिद्र्य रेषा निश्चीत करण्याकरीता नवीन गटाची स्थापना** :

भारतात दारिद्र्य रेषेखालील लोकांची नक्की संख्या याचा आढावा घेणे व निर्मूलन करण्याकरीता उपाययोजना सुचविण्याकरीता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निती आयोगाचे उपाध्यक्ष अरविंद पानगडिया यांच्या अध्यक्षतेखाली नवीन विशेष गटाची स्थापना केली आहे. सध्या देशात 40.09 कोटीच्यावर लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील असल्याचा अंदाज आहे. परंतु या आकडेवारीवर तज्ञांचे एकमत नाही.

**5) दारिद्र्य निर्मूलनार्थ भारत सरकारच्या योजना** :

भारत सरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनेपासूनच गरिवी हटाओ कार्यक्रमाअंतर्गत दारिद्र्यनिर्मूलनाचा कार्यक्रम सुरू केला होता. सहावी पंचवार्षिक योजना तयार करताना भारत सरकारने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे जीवनमान उंचविण्याचे महत्त्वपूर्ण धोरण आखले होते. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम तयार करताना भारत सरकारने डॉ. वि. म. दांडेकर व डॉ. रमाकांत रथ समितीने निश्चित निकष आधारभूत मानले गेले होते. याकरिता योजना आयोगाने उष्मांकाचे सेवन व दरडोई उत्पन्न हे दोन्ही आधार घेतले. या समितीने दारिद्र्य रेषेखाली कुटुंब निश्चित करण्याकरिता प्रत्येक व्यक्तीला ग्रामीण भागात निर्वाहासाठी दररोज 2400 उष्मांक तर शहरी भागाकरिता 2100 उष्मांकांची आवश्यकता निर्धारित केली होती, या उष्मांकाकरिता उत्पन्नाची मर्यादा 1960-61 च्या किमतीवर आधारित दारिद्र्य रेषा ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा रुपये 15 व शहरी भागासाठी दरडोई दरमहा रुपये 22.50 अशी निश्चित करण्यात आला होता, यापेक्षा कमी उत्पन्न

असलेली कुटुंबे ही दारिद्रय रेषेखालील कुटुंब असा निष्कर्ष लावण्यात आला होता. या काळात भारत सरकारने दारिद्रय निर्मूलनाकरिता खालील कार्यक्रम राबविले.

**(क) ग्रामीण भागातील जनतेकरीता सुरू केलेल्या योजना** : शासनाने खालील योजना ग्रामीण भागातील जनतेकरिता सुरू केल्या आहेत.

**1) एकात्मिक ग्रामीण विकास योजना (IRDP) :**

दारिद्रय निर्मूलन हे सहाव्या पंचवार्षिक योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. योजना आयोगाच्या अहवालानुसार सन 1977 ते 78 मध्ये भारतात 30.27 कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली होते. ही संख्या एकूण त्यावेळेच्या लोकसंख्येच्या 48.13% होती. सहावी पंचवार्षिक योजना तयार करतांना योजनाकारांनी सन 1984-85 पर्यंत एकूण दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या 30% लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते. या योजनेत योजना आयोगाने दारिद्र्यरेषेखालील कुटुंब निश्चित करताना ग्रामीण भागाकरिता 2400 कॅलरी व शहरी भागाकरिता 2100 कॅलरी उष्मांकाचे मापन निश्चित केले होते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा विकास करण्याकरिता भारत सरकारने 2 ऑक्टोंबर 1980 रोजी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू केला. पहिल्याच वर्षी हा कार्यक्रम देशातील 230 विकास खंडामध्ये सुरू करण्यात आला. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या अंतापर्यंत या कार्यक्रमाचा विस्तार संपूर्ण देशात करण्यात आला. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना आर्थिक सहाय्य देणे, शेतीकरीता अवजारे, बी-बियाणे व खते पुरविणे, दुग्धव्यवसायाकरिता पशू खरेदी करण्यास आर्थिक मदत करणे, अशा कुटुंबातील व्यक्तीकडे जमीन असेल, तर त्यांना विहीर खोदण्यास आर्थिक मदत देणे, इत्यादी कार्यक्रम सुरू करण्यात आले. हा कार्यक्रम राबविण्याकरिता स्वतंत्र एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा निर्माण केली असून या कार्यक्रमाअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाला अर्थसाहाय्य करण्याची जबाबदारी राष्ट्रीयकृत बँकेकडे सोपविण्यात आली आहे. राष्ट्रीयकृत बँक 4% दराने कर्जपुरवठा करते. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील किमान एका व्यक्तीस नियमित रोजगार मिळावा म्हणून भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगारसारखे कार्यक्रम सुरू केले.

**2) सुवर्णजयंती ग्राम स्वयः रोजगार योजना :**

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत एकात्मिक ग्रामीण विकास योजनेच्या जागी ही योजना सुरू करण्यात आली. 1 एप्रिल 1999 रोजी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये ट्रायसेस. ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालविकास योजना या योजनेच्या एकत्रिकरणातून

ही योजना सुरू करण्यात आली.

**उद्देश** : ही योजना सुरू करतांना खालील उद्देश निश्चीत करण्यात आले.

1. दारिद्र्यनिर्मूलनावर लक्ष केंद्रित करणे.
2. स्वयंसहाय्यता गटांना मदत करणे.
3. ग्रामीण भागात स्वयंरोजगार निर्माण करणे

**3) संपूर्ण ग्राम रोजगार योजना:**

ग्रामीण भागातील जनतेला आश्वासित रोजगार पुरविण्याच्या उद्देशाने भारत सरकारने ही योजना सुरु केली. आश्वासित रोजगार योजना व जवाहर ग्राम संमृध्दी योजना यांच्या एकत्रिकरणातून 25 सप्टेंबर 2001 रोजी ही योजना सुरू करण्यात आली.

**उद्देश** : ही योजना सुरु करतांना खालील उद्देश निश्चीत करण्यात आले.

1. ग्रामीण भागात टिकाऊ पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने रोजगार पुरविणे.
2. महिलांना जास्तीत जास्त रोजगार पुरविणे.
3. ग्रामीण भागातील जनतेला अन्न सुरक्षा पुरविणे.
4. दारिद्र्य रेषेखालील जनता, अनुसूचित जाती आणि जमातीची जनता । यांना जास्तीत जास्त रोजगार पुरविणे.

135

4) **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम 2005 अन्वये ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना 2 ऑक्टोबर 2006 रोजी सुरु करण्यात आली. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना आणि राष्ट्रीय कामाकरिता अन्न योजनेच्या एकत्रीकरणातून ही योजना सुरू करण्यात आली. या योजने अन्वये कोणत्याही एका अकुशल व्यक्तीला एका आर्थिक वर्षात 100 दिवस रोजगार पुरविण्याची हमी देण्यात आली आहे. अशा योजने अन्वये कामाकरिता अर्ज करणाऱ्या व्यक्तीला अर्ज केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत रोजगार पुरविला जातो.

5) **अंत्योदय अन्न योजना :**

ग्रामीण भागातील गरीब लोकांवर लक्ष केंद्रीत करून ही योजना डिसेंबर 2000 मध्ये सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील जनतेकरिता ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**उद्देश :** ही योजना सुरू करताना खालील उद्देश निश्चित करण्यात आले.

1. दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण भागातील जनतेला सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविणे,
2. प्रत्येकी 2 रु. कि. ग्रॅम दराने गहू आणि प्रत्येकी 3 रु. किलोग्रॅम दराने तांदूळ पुरविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.
3. प्रत्येक कुटुंबाला 25 किलो धान्य पुरविण्यात येते.

6) **पंतप्रधान रोजगार योजना :**

सुशिक्षित बेकार व्यक्तीला आपला व्यवसाय सुरू करण्याकरिता 2 ऑक्टोंबर 1993 रोजी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेन्वये लाभधारकास रुपये सात लाखांपर्यंत आर्थिक मदत दिली जाते.

7) **द्वारपोच योजना:**

महाराष्ट्र शासनाने गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासींना पावसाळ्यात अन्नधान्य वितरण सुलभ व्हावे म्हणून द्वारपोच योजना सुरू केली आहे. ही योजना जून 2013 पासून सुरू करण्यात आली आहे.

**(ख) शहरी भागाकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना** : शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीला रोजगार पुरविण्याच्या उद्देशाने खालील योजना सुरू करण्यात आल्या.

1) **सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना** : स्वातंर्त्याच्या सुवर्णजयंती वर्षात ही योजना सुरू करण्यात आली. डिसेंबर 1997 रोजी ही योजना जाहीर करण्यात आली.

**उद्देश :** ही योजना सुरु करताना खालील उद्देश निश्चित करण्यात आले.

1. शहरी भागातील गरीब जनतेला रोजगार पुरविणे.
2. शहरी भागातील गरीब व्यक्तीस स्वयंरोजगार सुरू करण्यास आर्थिक मदत देणे.
3. शहरी भागातील महिलांचे स्वंयसहाय्यता गट स्थापन करून त्यांना आर्थिक मदत करणे.

2) **पंतप्रधान एकात्मिक गरिबी निर्मूलन कार्यक्रम** : भारत सरकारने 18 नोव्हेंबर 1995 रोजी ही योजना सुरू केली. ही योजना सर्वप्रथम केरळ मधील कोटट्याम जिल्ह्यात लागू करण्यात आली.

**उद्देश :** ही योजना सुरू करतांना खालील उद्देश निश्चित करण्यात आले.

1. शहरी भागातील गरीब कौशल्यपूर्ण व्यक्तीस रोजगार पुरविणे.
2. शहरी भागातील व्यक्तीचा आर्थिक विकास करणे.
3. ज्या व्यक्तीकडे हस्तोद्योगाचे कौशल्य आहे अशा व्यक्तीला स्वयंरोजगार सुरू करण्यास आर्थिक मदत करणे.

3) **दारिद्र्य रेषेखालील युवतीकरिता सुकन्या योजना** : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण मंत्रालयामार्फत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात जन्माला येणाऱ्या मुलींना खालीलप्रमाणे सवलती प्रदान करण्यात येणार आहेत,

1. अशा कुटुंबात जन्माला येणाच्या मुलींचा जन्मतःच एक 21 हजार रुपयाचा आयुर्विमा काढण्यात येणार आहे.

मुलगी 18 वर्षांची झाली असता तिला एक लाख रुपये देण्याची तरतूद आहे.

3. मुलींच्या पालकाचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा पूर्णपणे अपंगत्व आल्यास तर 104, 000 रुपये देण्याची तरतूद आहे.

4. अशा मुलींना 9 ते 12 पर्यंत शिक्षणाकरिता दरमहा 100 रुपये शिष्यवृत्ती देण्याची तरतूद या योजनेत आहे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे असे कुटुंब या योजनेचे लाभार्थी ठरणार आहेत. ही योजना 1 जानेवारी 2014 पासून लागू करण्यात येत आहे.

**4) अन्नसुरक्षा विधेयक - 2011** : भारतातील सुमारे ग्रामीण भागातील 175 टक्के; तर शहरातील 50 टक्के जनतेला स्वस्त दरात अन्न उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भारत सरकारने महत्त्वाकांक्षी अन्नसुरक्षा कार्यक्रम सुरू केला असून हा कार्यक्रम माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीदिनी राष्ट्राला समर्पित करण्यात आला. या कार्यक्रमाची अंमलबजावणी दिल्ली, हरियाणा व उत्तराखंड या राज्यांत तात्काळ सुरू झाली. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कार्यक्रमामध्ये खालील तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

1. या योजनेचा लाभ घेण्याकरिता शहरी भागात उत्पन्नाची वार्षिक मर्यादा 59 हजार रुपये आणि ग्रामीण भागाकरिता 44 हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे.

2. अंत्योदय योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींना महिन्याला 35 किलो धान्य देण्यात येणार आहे. इतर लाभार्थींना दरमहा माणसी 5 किलो धान्य देण्यात येणार आहे.

3. सर्व लाभार्थींना पुरविण्यात येणाऱ्या धान्याचा दर गहू 2 रुपये किलो आणि ज्वारीसारखे धान्य 1 रुपये किलो दराने आणि तांदूळ किलो दराने पुरविण्यात येणार आहे.

**5) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना** - 2014 : शहरी भागातील बेकारी दूर करणे आणि शहरी भागातील युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने तंत्रज्ञान प्रशिक्षण देण्याकरीता पंतप्रधान कौशल्य विकास योजना सुरु करण्यात आली आहे. ही योजना 15 मार्च 2015 रोजी सुरु करण्यात आली असून या योजनेवर एकूण 1120 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. ही योजना सुरु करण्याच्या उद्देशाने खालील उद्दीष्ठ निश्चीत करण्यात आली आहेत.

1. 1.4 दशलक्ष युवकांना तांत्रिक प्रशिक्षण देणे
2. ही योजना राबविण्याकरीता राष्ट्रीय कौशल विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.
3. 10 वी ते 12 वीनंतर शाळा सोडणाऱ्या युवकांना या योजने अन्वये प्रशिक्षण देण्यअत येणार आहे.
4. या योजनेअन्वये प्रशिक्षीत झालेल्या युवकांना मेक इन इंडीया, डिजीटल इंडीया आणि राष्ट्रीय सौर मिशन या कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यात येणार आहे.
5. ही योजना राबविण्याकरीता राज्यांचा सहभाग घेण्यात येत आहे.

**संदर्भ** :


1) देशपांडे श्रीधर, भारताची अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिशींग हाऊस

2) Indian Economy - Rudrra Datta of Sundaram, 2020, S. Chand Group of company

3) Indian Development Report 2017, Oxford University Press